# लोक महाविद्यालय, वर्धा

## अर्थशास्त्र विभाग, अहवाल 2017–18

वर्षाच्या शेवटी सराव परीक्षा घेण्यात आली.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून अर्थशास्त्र विभाग सुरू झाला. सन 2017–18 या शैक्षणिक सत्रात बी.ए.भाग तीन साठी सत्र पध्दती लागू करण्यात आली. अर्थशास्त्र विभागाद्वारे नव्याने अर्थशास्त्र अभ्यास मंडळ स्थापन करण्यात आले्त. **बी.ए. भाग १ च्या विध्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यानंतर जुलै महिन्यात एक आठवडा** अर्थशास्त्रा**ची तोंडओळख व्हावी म्हणून,** अर्थशास्त्र **परिचय** अभ्यास**क्रम शिकविण्यात आला ऑगस्ट महिन्यामध्ये कमकुवत असणारे विध्यार्थी व हुशार विध्यार्थी शोधण्यासाठी त्यांची घटक चाचणी घेण्यात आली. जे विध्यार्थी** अभ्यास **क्रमात मागे हते त्यांचासाठी Remedial Coaching Class घेण्यात आला. हुशार विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील विविध पुस्तके व websites सुचविण्यात आल्या अर्थशास्त्राच्या सर्व विधार्थांची सभा घेऊन** अर्थशास्त्र अभ्यास मंडळ **गठित करण्यात आले. प्रथम सत्रात दोन यूनिट टेस्ट व्द्वितीय सत्रात एक यूनिट टेस्ट घेण्यात आली.** वर्षाच्या शेवटी सराव परीक्षा घेण्यात आली.

अभ्यास मंडळाव्दारे विवीध **कार्यक्रम घेण्यात आले** अर्थशास्त्राचे महत्व विद्यार्थ्यांना कळावे, त्यांच्या मनात अर्थशास्त्राविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी या उद्देशाने बी.ए. भाग 1,2,3 आणि एम.ए. भाग 1 व 2 च्या विद्यार्थ्यासाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राला विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. बी.ए. भाग 1,2,3 तसेच एम.ए. भाग 1 व 2 च्या विद्यार्थ्यांना असाईनमेंट देण्यात आले. त्यावर विद्यार्थ्यांचे सेमिनार घेण्यात आले.काही विद्यार्थ्यांनी पीपीटी व्दारे प्रस्तुतीकरण केले त्यावर दिलेल्या विषयाबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती प्राप्त झाली.अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सत्र 2017–18 मध्ये ऑनलाईन बॅकींग व डिजीटल मार्केटिंग या विषयावर व्हॅल्यू ॲडेड कोर्स चालविण्यात आला.त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. अशाप्रकारे अर्थशास्त्राचा विद्यार्थी अधिक डोळस आणि चिकित्सक होण्याच्या उद्देशाने अर्थशास्त्र अभ्यास मंडळाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले.

जी.एस.टी. या विषयावर व्याख्यान :– अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने जी.एस.टी. (वस्तू व सेवा कर) या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुनिल पाटणे सर, कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रा. चव्हाण सर यशवंत महाविद्यालय, वर्धा, हे होते. प्रा. चव्हाण सरांनी वस्तू व सेवा कर म्हणजे काय आणि त्याचे फायदे व तोटे विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले. या कार्यक्रमात प्रा. महेंद्र सहारे, प्रा. विशाल खोंडे, प्रा. शुभांगी राऊत, प्रा. विकास नाखले, प्रा. सुजाता जोशी, उपस्थित होते. बी.ए. व एम.ए. अर्थशास्त्र विषयाचे सर्व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

उद्योग भेटः– चालू शैक्षणिक वर्षात औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. अर्थशास्त्र विषयाच्या अनुषंगाने सहलीचे आयोजन होते. पारले जी कंपनी नागपूर, तसेच रामधाम धापेवाडा येथे एक दिवसीय सहल नेण्यात आली. पारले जी कंपनीत विद्यार्थ्यांना तेथील उत्पादन कार्याविषयी,उत्पादनानंतर माल वेष्टनामधे व्यवस्थीत पॅक करणे,उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री, प्रशिक्षित मजुरांची कार्यपध्दती या संबंधी बरीच माहिती प्राप्त झाली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ झाली.

''कॅशलेस अर्थव्यवस्थेसाठी पेटिएम सुविधा'' या विषयावर व्याख्यान :–

दि. 6/03/2018 ला या विषयावर महाविद्यालयात व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री रूपम तांबेकर तसेच सौ. सुचिता जंगम हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे म्हणाल्या की देशात नोटबंदीनंतर आर्थिक व्यवहार करणे लोकांना कठीण झाले आणि कॅशलेस व्यवहारांची

आवश्यकता निर्माण झाली, त्यासाठी पेटिएमचा व्यवहार प्रत्येकाने शिकून घ्यावा आणि त्याचा वापर करावा. म्हणजे कॅश नसेल तरीही व्यवहार करणे सोयीचे होते. असे त्या म्हणाल्या. त्याचप्रमाणे प्रमुख अतिथी मा. श्री. रूपम तांबेकर म्हणाले की पेटिएम द्वारे आर्थिक व्यवहार करणे सोयीचे होते. तसेच पेटिएम द्वारे कॅशबॅक ऑफरचा लाभ घेता येतो.फोन बील, इलेक्ट्रीक बील, बस तिकीट पैसे टान्सफर करणे ही कामे जलद करता येतात. त्यासाठी रांगेत उभे राहण्याची आवश्यकता नाही. आर्थिक व्यवहाराचे फायदे त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर समजावून सांगितले. या कार्यक्रमाला प्रा. विकास नाखले, प्रा. विशाल खोंडे, प्रा. खोब्रागडे, प्रा. सुजाता जोशी उपस्थित होते. अर्थशास्त्राच्या बी.ए. व एम.ए. च्या विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाचा लाभ झाला. वरील सर्वच कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्या मा. डॉ. सौ. पुष्पा तायडे यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रेरणा व सहकार्य लाभले. तसेच प्रा. विकास नाखले, प्रा. विशाल खोंडे, प्रा.शरद खोब्रागडे, प्रा. सुजाता जोशी तसेच अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

प्राचार्या डॉ. सौ. पुष्पा तायडे<br>
अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>
लोक महाविद्यालय, वर्धा.